Estd 1962
Naac 'A++' Grade

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# १९/९/२०२१

शिवाजी विद्यापीठाच्या उन्हाळी सत्रातील मार्च/एप्रिल २०२१ च्या परीक्षा दि.१० ऑगस्ट २०२१ पासून ऑनलाईन पध्दतीने सुरळीतपणे सुरु झाल्या असून या परीक्षापैकी बी.एस्सी. अभ्यासक्रमाची परीक्षा दि.१८ ऑगस्ट २०२१ पासून सुरु झाली होती. तथापि काही तांत्रिक कारणास्तव विद्यापीठाच्या परीक्षा न देवू शकलेल्या विद्यार्थ्यांसाठी त्यांची बी.एस्सी. अंतिम वर्ष अभ्यासक्रमाची पुनर्रपरीक्षा दि. १८ सप्टेंबर २०२१ रोजी पार पडली.

विद्यापीठातील तसेच विविध महाविद्यालयातील विविध पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी आवश्यक असणारी पी.जी.प्रवेश परीक्षा नुकतीच पार पडली. तथापि पी.जी. प्रवेश परीक्षांचे निकाल जाहीर करण्याच्या अनुषंगाने बी. एस्सी. अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षाचे निकाल तात्काळ जाहीर करणे क्रमप्राप्त होते. तो निकाल जाहीर करण्यासाठी परीक्षा विभागातील बी.एस्सी विभाग व आय.टी. सेल विभागातील अधिकारी/कर्मचारी यांनी युध्दपातळीवर काम करुन बी.एस्सी. अंतिम वर्षाचा निकाल आज दि.१९—९—२०२१ रोजी जाहीर केला. सदरचा निकाल हा एका दिवसातच जाहीर झाला आहे. यासाठी संबंधित विद्यार्थ्यानी विद्यापीठाचे संकेतस्थळावर निकालाची माहिती घ्यावी. तसेच अद्याप ज्या विद्यार्थ्यांची परीक्षा सुरु झालेली नाही त्यांनी मॉक टेस्ट सत्वर द्यावी म्हणजे मुख्य परीक्षेत तांत्रिक अडचणी येणार नाहीत असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक श्री.गजानन पळसे यांनी महाविद्यालयास केले.